प्रेसनोट

# राजर्षी शाहु महाराज जयंती व सामजीक न्यायदिन व जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा

जा.क्र. ३२५/माहिती कक्ष/वार्तापपत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०६/२०१८

भंडारा:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २६/०६/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या मार्गदर्शनात रश्मी नांदेडकर अपर पोलीस अधीक्षक भंडारा, श्री. ताजणे प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह) यांच्या उपस्थीतीत राजर्षी शाहु महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्याचा जिवण पट व केलेल्या विधायक कार्याबाबत माहीती देण्यात आली.

राजर्षी शाहु महाराज कोल्हापुरचे प्राचीन नाव करवीर या ठिकाणचे राहणारे होते. भारतावर इंग्रजाचे राज्य होते.त्यावेळी कोल्हापुरचे राज्य राजर्षी शाहु महारज यांचे ताब्यात होते. शिवाजी राजे यांचे निधनानंतर १७ मार्च १८८५ साली शिवीजी राजाचे दत्तक पुत्र शाहु महाराज गादीवर बसले तेव्हा त्याचे वय १० वर्षाचे होते. त्यांनी राजकोटला शिक्षण घेतले. त्यांना कुश्ती अधीक आवडत असे व त्यानी त्या काळात संपुर्ण भारत देश हिंडुन काढला. भारतात सुधारणा झाली पाहीजे व भारत आदर्श झाला पाहीजे असे त्यांना वाटे, त्यांनी बालविवाह बंद केले. शिक्षणाची सोय केली. असे हे प्रजाहितदक्ष व सुधारलेल्या विचाराचे निर्भय राजे होते. राजर्षी शाहु महाराज हे दि. ६ मे १९२२ रोजी मुंबईत निधन झाले या सामजीक सुधारणा करणा–या थोर पुरूषाचा जन्म दिवस सामाजीक न्यायदीन म्हणुन आज आपण साजरा करीत आहोत.

तसेच आज दि. २६ जुन जागतीक अमली पदार्थ विरोधी दिन असुन अमली पदार्थ सेवणाने मानसाला विशिष्ट प्रकारची सुस्ती, नशा, तार किंवा धुंदी येते त्यांना मादक पदार्थ किंवा अमली पदार्थ म्हणतात. सन १९७६ साली संयुक्त राष्ट्र संघाने हा विषय महत्वाचा मानला असुन भारतात नारकोटीक्स ड्रक्स अॅन्ड सायकोट्रॉपीक सबस्टंसेस अॅक्ट १९८५ साली केलेला आहे. तसेच आपल्या देशाच्या हद्दीत अमली पदार्थाची तस्करी करणा–या देशाना लागुन असल्यामुळे प्रमाण वाढत आहे. त्यावेळी सर्वानी यापासुन दुर राहावे असे आवाहन करण्यात करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला श्री.गाडे पोनी. वानीशा, मंडलवार पोनी., पाटील पोनी, ,पोटे सपोनी. स्था.गु.शा. सपोनी. काळे स्थागुशा भंडारा, गावंडे सपोनी., तुळजेवार, पोउपनी.अपर पोलीस शाखा भंडारा, आढोळे पोउपनी. दोषसीध्दी शाखा, पंधरे पोउपनी. श्वान पथक भंडारा, पोउपनी. माळी बि. स. विभाग भंडारा, पोलीस मुख्यालय, पोलीस उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

(एस.बी.ताजणे)
प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह )
दुरध्वनी.क्र. ९५४५९९७०२५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.